ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग,
अर्थशास्त्र, व्यापार,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
प्रमुख मराठी
वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या
पहिल्या व तिसऱ्या
बुधवारीं
प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३० | पुणें, बुधवार, २ डिसेंबर, १९६४ | अंक २१

SCG-1 HIN

## नहीं—
## यह कोई
## साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



नवल सोडा वाटर यंत्र | घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.
फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ४०८१२

# विविध माहिती

**संशोधनासाठी अग्निबाण**—येत्या सहा महिन्यांत केरळमधील अग्निबाण संशोधन केंद्रावरून २० अग्निबाण आकाशांत पाठविले जाणार आहेत. हा काळ संशोधनाच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाचा मानण्यांत आला आहे. अवकाश संशोधनाचे प्रयोग करण्यासाठी हा काळ सगळ्यांत अनुकूल असल्यानें अग्निबाणांच्या उड्डाणानें नेहमींपेक्षा अधिक माहिती मिळण्याचा संभव असल्याचें मत केंद्राच्या प्रमुखानें व्यक्त केलें आहे.

**गोव्यांत दारूचा सुकाळ**—युकॅरिस्ट कॉंग्रेसच्या निमित्तानें गोव्याला जाणाऱ्या यात्रेकरूंना मुबलक प्रमाणांत दारू मिळणार आहे. भारत सरकारच्या हौशी प्रवासी खात्यानें निरनिराळ्या प्रकारची दारू आयात करण्यासाठी २० हजार रुपयांचें परदेशीय चलन मंजूर केलें आहे. परदेशी दारूशिवाय देशी दारूहि मुबलक प्रमाणांत मिळणार आहे. पाण्याच्या वापरावर मात्र निर्बंध घालण्यांत आले आहेत.

**खताच्या कारखान्यांसाठी मदत**—अमेरिकन कंपन्यांच्या एका गटानें भारतांत खताचे पांच मोठे कारखाने काढण्याच्या कामीं मदत देण्याची तयारी दाखविली आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस संकल्पित कारखान्यांच्या द्वारा १० लाख टन रासायनिक खतांचें उत्पादन करतां येईल असा विश्वास व्यक्त करण्यांत येत आहे. कारखान्यांसंबंधींचा अभ्यास करण्याची परवानगी अमेरिकन कंपन्यांना देण्यांत आली आहे.

**चीनला गव्हाची विक्री**—फ्रान्सनें चीनला १० लाख टन गहूं विकत देण्याचें कबूल केलें आहे. हा गहूं देणें फ्रान्सला शक्य व्हावें म्हणून युरोपीय सामाईक बाजारपेठेच्या अधिकाऱ्यांनीं तो सवलतीच्या दरानें विकण्यास मंजुरी दिली आहे. ह्या सवलतीमुळें फ्रान्सला गव्हाचा पुरवठा करणें सोपें जाणार आहे.

**कोलंबो मदत योजनेची मुदतवाढ**—कोलंबो मदत योजनेची मुदतवाढ करून ती १९६६ ते १९७१ पर्यंतच्या पांच वर्षांत चालूं ठेवण्यांत यावी अशी शिफारस करण्यांत आली आहे. अविकसित देशांना देण्यांत येणारी मदत अधिक सैल अटीवर देण्यांत यावी, ह्या देशांच्या प्राथमिक स्वरूपाच्या मालाच्या किंमती स्थिर ठेवण्यांत याव्या आणि त्यांच्या पक्क्या मालाला नव्या बाजारपेठा मिळवून द्याव्या, अशाहि शिफारसी करण्यांत आल्या आहेत.

**तेलशुद्धीच्या कारखान्यासाठी नवा रस्ता**—मद्रासजवळ काढण्यांत यावयाचा तेलशुद्धीचा कारखाना राजरस्त्यापासून कांहींसा दूर आहे. कारखान्याच्या जागेकडे जाणारा सध्यांचा रस्ता अवजड वाहतुकीला योग्य नाहीं. विशेषत: त्या रस्त्यावरील एक पूल अरुंद आहे. त्यामुळें नवा रस्ता बांधणें जरूर झालें आहे. रस्त्याच्या कामासाठीं सुमारें १५ लाख रुपये खर्च येईल.

**बंगलोर–पणजी थेट मोटारमार्ग**—म्हैसूर राज्याच्या रस्ता वाहतूक मंडळानें बंगलोर ते पणजी ह्या मार्गावर थेट प्रवासी वाहतूक सुरू केली आहे. ही वाहतूक रात्रीं करण्यांत येत आहे. बंगलोर ते पणजी हें अंतर ३९४ मैलांचें असून तें काटण्यासाठी गाड्यांना १७॥ तास लागतील. गाड्या वाटेंत १५ ठिकाणीं थांबणार आहेत. रात्रीच्या वेळीं चालणारी ही पहिलीच थेट गाडी आहे.

**अमेरिका व रशिआचें सहकार्य**—समुद्राच्या खाऱ्या पाण्याचें अणुशक्तीच्या साहाय्यानें गोड्या पाण्यांत रूपांतर करण्याच्या कामीं करावयाच्या संशोधनासंबंधीं अमेरिका व रशिआ ह्यांच्यांत सहकार्याचा करार करण्यांत आला आहे. कराराची मुदत २ वर्षांची आहे. कराराची अंमलबजावणी ताबडतोब होणार आहे. असा करार करण्यासाठी प्रे. जॉन्सन आणि माजी रशिअन पंतप्रधान क्रुश्चोव्ह ह्यांच्यांत पत्रव्यवहार चालू होता.

**अहमदाबाद येथें संशोधन-संस्था**—अखिल भारतीय कारखाना संघटना अहमदाबाद येथें एक औद्योगिक संशोधन संस्था स्थापन करण्याच्या विचारांत आहे. संस्था संघटनेच्या गुजरात शाखेतर्फे चालविण्यांत येणार असून ती सर्व प्रकारच्या उद्योगधंद्यांबाबत संशोधन करील. संशोधनाच्या कामासाठी एक रसायनशास्त्राची व एक पदार्थविज्ञान शास्त्राची प्रयोगशाळा उभारण्यांत येणार आहे.

**दुर्गापूर येथील खताचा कारखाना**—दुर्गापूर येथें काढण्यांत यावयाचा खताचा कारखाना बंगाल राज्यसरकारच्या मालकीचा म्हणून काढण्याचें ठरलें होतें. परंतु बंगाल सरकारनें हा कारखाना काढण्याचें काम मध्यवर्ती सरकारनेंच अंगावर घ्यावें अशी विनंती केली आहे. संकल्पित कारखान्यासाठी ३५ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. बंगालमध्यें कांहीं नवीन औष्णिक वीजकेंद्रें उभारण्याचें ठरल्यामुळें खत कारखान्यासाठी सरकारजवळ पुरेसा पैसा नाहीं असें सांगण्यांत येत आहे.

**संगमनेर येथें सायन्स कॉलेज**—पुढील वर्षाच्या शैक्षणिक वर्षापासून संगमनेर येथें एक सायन्स कॉलेज स्थापन करण्यांत येणार आहे. सिन्नर येथील विडीचे एक कारखानदार श्री. बाबूशेट सारडा ह्यांनीं कॉलेजच्या स्थापनेसाठी १ लाख रुपयांची देणगी दिली आहे. पुणें विद्यापीठाच्या प्रतिनिधींनीं कॉलेजच्या जागेची पाहणी करून मंजुरी दिली आहे. संगमनेर येथें एक आर्टस् व कॉमर्स कॉलेज चालूं आहेच.

**रशिआंतील सोन्याचें उत्पादन**—अमेरिकेच्या खाणी-खात्यानें १९६३ सालचें खनिजाच्या उत्पादनाचें वार्षिक प्रसिद्ध केलें आहे. वार्षिकांत रशिआच्या सोन्याच्या उत्पादनाबद्दल करण्यांत आलेल्या अंदाजाप्रमाणें १९६३ सालीं रशिआंत १·२५ कोटी औंस सोन्याचें उत्पादन झालें. १९६२ सालापेक्षा हें उत्पादन ३ लाख औंसांनीं अधिक आहे. हा अंदाज खरा धरल्यास सोन्याच्या उत्पादनांत फक्त दक्षिण आफ्रिकेचाच अनुक्रम रशिआच्या वर लागतो.

**खेळण्यांची उसनवारी**—वाचनालयांतून ज्याप्रमाणें पुस्तकें देण्यांत येतात, त्याप्रमाणें मुलांना खेळणीं देण्याची एक योजना दिल्ली येथें चालूं करण्यांत आली आहे. १९५८ सालीं लहान मुलांना खेळणीं देण्यासाठी एक संस्था स्थापन करण्यांत आली होती. खेळण्यांची अदलाबदल करण्याची कल्पना ह्या संस्थेच्या मुळाशीं आहे. ह्या संस्थेला 'चाचा नेहरू खेळणी संग्रहालय' असें नांव देण्यांत आलें आहे. मुलांना अशीं खेळणीं देण्याची व्यवस्था डेन्मार्कमध्यें मोठ्या प्रमाणावर आहे. दिल्ली येथील संघटनेला डेन्मार्ककडून १,००० खेळणीं व बाहुल्या देणगीदाखल देण्यांत आल्या आहेत. योजनेचें उद्घाटन डेन्मार्कमधील चार मुलें करणार आहेत.

# अर्थ

बुधवार, ९ डिसेंबर, १९६४





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## साखरेच्या सहकारी कारखान्यांची वाटचाल

सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणाऱ्या साखरेच्या कारखान्यांनीं आपलें काम व्यवस्थित रीत्या चालूं ठेवलें आहे. आपआपलें उत्पादन वाढविण्याच्या बाबतींत आणि भारतामधील साखरेच्या एकूण उत्पादनांत आपला हिस्सा वाढविण्याच्या कामीं त्यांनीं खाजगी मालकीच्या साखरेच्या कारखान्यांवर आघाडी मारली आहे. साखरेच्या निर्यातींतहि सहकारी साखर कारखाने अग्रेसर आहेत. १९६३-६४ सालीं जितक्या कच्च्या साखरेची निर्यात करण्यांत आली त्यांपैकीं ४४ टक्के साखर सहकारी कारखान्यांनीं पुरविलेली होती. महाराष्ट्रांतील १४ कारखान्यांनीं निर्यातीसाठीं १ लाख टन कच्च्या साखरेचें उत्पादन केलें. १९६२–६३ सालीं ८ कारखान्यांनीं मिळून ८० हजार टन कच्च्या साखरेचें उत्पादन केलें होतें. सहकारी साखर कारखान्यांच्या पाहणीवरून असें दिसून येतें कीं सहकारी साखर कारखान्यांची नोंदलेली संख्या ५७ आहे. त्यांपैकी ४८ कारखाने १९६३–६४ सालीं साखरेचें उत्पादन करीत होते. त्यांनीं ५·७६ लाख टन साखर निर्माण केली. त्यापूर्वीच्या १२ महिन्यांत ४१ कारखान्यांनीं मिळून ४·५६ लाख टन साखरेची निर्मिति केली होती. १९६२-६३ सालीं भारतामधील साखरेच्या एकूण उत्पादनापैकी २१·६ टक्के इतक्या साखरेचें उत्पादन सहकारी कारखान्यांनीं केलें होतें. १९६३-६४ सालीं सहकारी विभागांत उत्पादित झालेल्या साखरेची टक्केवारी २२·८ अशी आहे. १९६३–६४ सालीं देशांतील साखरेचें एकूण उत्पादन २५ लाख टन झालें. त्यापूर्वीच्या हंगामांतील उत्पादन २१ लाख टन झालें होतें. गेल्या वर्षी साखरेच्या उत्पादनांत १९·६२ टक्के वाढ झाली. परंतु सहकारी कारखान्यांमधील उत्पादनवाढ २६·३ टक्के झाली. महाराष्ट्रांतील दोन सहकारी साखर कारखान्यांत साखरेचा उतारा सर्वांत अधिक म्हणजे १३·२ टक्के आणि १३·६ टक्के असा पडला.

---

## शिक्षणाचा दर्जा आणि आर्थिक परिस्थिति

शाळाकॉलेजांतून शिक्षणाचा दर्जा खालावल्याची तक्रार अलीकडे नेहमींच करण्यांत येते. दर्जा खालावण्याचीं अनेक कारणें विविध दृष्टिकोनांतून देण्यांत येतात. ह्या बाबतींत केरळ विद्यापीठानें केलेल्या पाहणीवरून ह्या प्रश्नाच्या आर्थिक बाजूवर चांगला प्रकाश पडतो. सामान्यपणें शिक्षणाच्या पद्धतीवर अगर शिक्षकपेशावर दर्जा खालावण्याचें खापर फोडण्यांत येतें. पण केरळ विद्यापीठानें केलेल्या पाहणीवरून असें दिसून येतें कीं, विद्यार्थ्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थितीहि शिक्षणाच्या अधोगतीला मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहे. ज्या मुलांच्या पालकांचीं मासिक उत्पन्नें २०० रुपये अगर त्यापेक्षा अधिक होतीं त्यांच्या मुलांपैकी ८९ टक्के मुलें पास झालीं. तर उलट ज्यांचीं उत्पन्नें ५० रुपयांपेक्षा कमी होतीं त्यांच्या मुलांपैकी ३३ टक्केच मुलें पास झालेलीं आढळून आलीं. अपुऱ्या उत्पन्नाच्या संसारांत मुलांची सर्व बाबतींत कुचंबणा होते ही गोष्ट उघडच आहे. मोठ्या कुटुंबांतील मुलांना अभ्यासाला शांत जागा मिळण्याचीसुद्धां मारामार पडते; मग बाकीच्या सोई कोठून मिळणार ? दुसरें असें कीं, कमी उत्पन्न असणाऱ्या गटांतील पालकांना आपल्या मुलांवर देखरेख ठेवण्यास आणि त्यांना मार्गदर्शन करण्यास पुष्कळदा सवडच मिळत नाहीं, आणि मिळाली तरी तिचा उपयोग करण्याइतकी मनःशांति त्यांना कधींच असत नाहीं. उलटपक्षीं सधन कुटुंबांतील मुलांना शैक्षणिक सवलती आणि मार्गदर्शन ह्यांचा लाभ सहजच होतो. ज्याला वरचा–वरिष्ठ–मध्यम वर्ग असें म्हणतात त्यांच्या मुलांना तर कॉन्व्हेंट शाळांसारख्या महाग शाळांतूनहि जातां येतें. तात्पर्य, शिक्षणानें मिळणाऱ्या नव्या संधि अजूनहि सुस्थितींतील पालकांच्या मुलांनाच अधिक प्रमाणांत मिळतात.

---

## झेकोस्लोव्हाकिआंत नवीन आर्थिक धोरण

पश्चिम युरोपीय देशांनीं सामायिक बाजारपेठेची स्थापना केल्यानंतर रशिआ आणि त्याच्या कक्षेंतील पूर्व युरोपीय देशांनींहि आपली आर्थिक संघटना उभारली. ह्या संघटनेचा उद्देश रशिआ व पूर्व युरोपांतील देश ह्यांच्यांतील आर्थिक घडामोडींचें एकसूत्रीकरण करण्याचा होता. परंतु एकसूत्रीकरणाच्या ह्या धोरणाला रशिआखेरीज इतर देशांनीं फारसा पाठिंबा दिला नाहीं. अशा धोरणामुळें आपआपल्या देशांच्या आर्थिक विकासाला योग्य तें स्थान मिळणार नाहीं, अशी शंका पूर्व युरोपमधील देशांच्या सरकारांनीं व्यक्त केली. ह्या फाटाफुटीला स्टॅलिनच्या हयातींतच प्रारंभ झाला होता. प्रथम युगोस्लाव्हिआनें स्वतःच्या आर्थिक विकासासाठी स्वतंत्र धोरण आंखलें. युगोस्लाव्हिआचा व रशिआचा बेबनाव होण्याच्या कारणांपैकी हें एक होतें असें म्हणतात. त्यानंतर पोलंड व अलीकडे रुमेनिया ह्या देशांनींहि रशिआच्या आर्थिक कार्यक्रमाशीं आपला कार्यक्रम जखडण्यास मान्यता दिली नाहीं. ह्याच मालिकेंत आतां झेकोस्लोव्हाकिआचाहि समावेश करावा लागेल. झेकोस्लोव्हाकिआनें आर्थिक व्यवहारांत सुधारणा करण्याचें ठरविलें आहे. उद्योगधंद्यांतील सर्व पातळींवर करण्यांत येणारें मध्यवर्ती आर्थिक नियोजन सैल करण्यांत येणार आहे. प्रत्येक कारखान्याच्या चालकाला आपले स्वतःचे निर्णय घेण्यास परवानगी देण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें प्रत्येक कारखान्यानें आपला व्यवहार स्वयंपूर्ण करण्याचीहि जबाबदारी मॅनेजरवर टाकण्यांत येणार आहे. झेकोस्लोव्हाकिआच्या सरकारनें केलेल्या ह्या सुधारणा निर्बंधमुक्त अर्थव्यवस्थेच्या व बाजारपेठेच्या स्वरूपाच्या आहेत. एका बाबतींत मात्र भांडवलदारी अर्थव्यवस्थेपेक्षाहि अर्थव्यवस्था संपूर्णपणें वेगळी आहे; झेक देशांतील सर्व उद्योगधंद्यांची मालकी पूर्णपणें सरकारचीच राहील.

---

### वाचनाच्या अभिरुचीबद्दल उद्बोधक माहिती

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या वैज्ञानिक आणि शास्त्रीय उपसंघटनेनें १९६१ सालचें आपलें सांवत्सरिक प्रसिद्ध केलें आहे. ह्या नियतकालिकांत सभासद देशांबद्दल अनेक प्रकारची आंकडेवार माहिती देण्यांत येत असते. १९६१ च्या वार्षिकांत निरनिराळ्या देशांतील लोकांच्या वाचनाच्या अभिरुचीबद्दल बोधप्रद माहिती देण्यांत आली आहे. निरनिराळ्या देशांतील लोकांच्या मनोवृत्तीचा एक प्रकारचा आरसाच माहितीच्या रूपानें तयार करण्यांत आला आहे. वाचन म्हटलें कीं सामान्यतः वाङ्मयाचें वाचन, असाच अर्थ करण्यांत येतो. वाङ्मयाबद्दलचें हें आकर्षण कमी झालेलें नसलें तरी इतर ज्ञानशास्त्रांचीं पुस्तकेंहि असंख्य वाचक आकर्षून घेत असतात. अमेरिका, फ्रान्स, ब्रिटन आणि जपान ह्या देशांतील लोकांचा कल अजूनहि वाङ्मय वाचण्याकडेच अधिक आहे. पश्चिम जर्मनींतील लोक सामाजिक शास्त्रावरील पुस्तकें अधिक प्रमाणांत वाचतात; इतकेंच काय; पण कादंबऱ्यांपेक्षाहि ह्या पुस्तकांना ते प्राधान्य देतात. रशिअन लोक शास्त्रीय ज्ञानाच्या व्यावहारिक उपयोगाची माहिती देणारीं पुस्तकें सर्वांत जास्त आवडीनें वाचतात. ह्यावरून रशिअन लोकांची शास्त्रीय ज्ञानाबद्दलची ओढ स्पष्टच होत आहे. पश्चिम जर्मनींत आणि फ्रान्समध्यें धार्मिक विषयावरील पुस्तकेंहि बरींच लोकप्रिय आहेत. रशिआ व जपान ह्या देशांत तत्त्वज्ञान ह्या विषयावरील पुस्तकें बऱ्याच मोठ्या प्रमाणावर वाचलीं जातात. पुस्तकांच्या प्रकाशनाच्या बाबतींत रशिआचा क्रम पहिला लागतो. १९६१ सालीं रशिआंत ७४ हजार पुस्तकें प्रसिद्ध करण्यांत आलीं. ब्रिटननें २५ हजार, जपाननें २४ हजार, पश्चिम जर्मनीनें २२ हजार, अमेरिकेनें १८ हजार व फ्रान्सनें १२,७०० पुस्तकें प्रसिद्ध केलीं. भारतांत ९ हजार पुस्तकें प्रसिद्ध करण्यांत आलीं.

---

### अन्नधान्याच्या कॉर्पोरेशनचें कार्य

गेल्या कांहीं महिन्यांत अन्नधान्याचा पुरवठा व किंमती ह्यासंबंधीं चिंताजनक परिस्थिति निर्माण झाल्यामुळें भारत सरकारनें अन्नधान्यासंबंधीं एक कॉर्पोरेशन स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. कॉर्पोरेशनचीं मुख्य कचेरी मद्रास येथें राहणार असून तिचें प्राथमिक भांडवल १०० कोटी रुपयांचें असेल. कॉर्पोरेशनचा कारभार पाहण्यासाठीं १२ डायरेक्टरसचें एक मंडळ बनविण्यांत येईल. त्यांत मंडळाचा अध्यक्ष आणि मॅनेजिंग डायरेक्टर ह्यांचाहि समावेश आहे. भारत सरकारच्या अन्न, फायनान्स आणि सहकार ह्या खात्यांचाहि एक एक डायरेक्टर बोर्डावर काम करणार आहे. कॉर्पोरेशनचें सर्व भांडवल पार्लमेंटच्या संमतीनें सरकारच पुरविणार असून त्यांत वाढ करण्याचा अधिकारहि सरकारला आहे. कॉर्पोरेशन शेतकऱ्यांना त्यांच्या मालाच्या तारणावर कर्ज पुरवेल आणि पीक हातीं आल्यावर तें विकत घेण्याचे करार करील. शेड्यूल्ड बँका अगर इतर द्रव्यविषयक संस्था ह्यांच्याकडून अन्नधान्य पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जें मिळवून देऊन त्यांची हमीहि कॉर्पोरेशन घेईल. मात्र सुगीनंतर शेतकऱ्यांनीं कॉर्पोरेशनलाच माल विकला पाहिजे असे करार त्यांना करून द्यावे लागतील. सरकारची आगाऊ संमति घेऊन अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्यासंबंधीं उपाययोजनाहि कॉर्पोरेशनला करतां येईल. गरज वाटली तर धान्याच्या सांठ्याच्या तारणावर सरकारनें मान्यता दिलेल्य बँकांकडून अगर शेड्यूल्ड बँकांकडून कॉर्पोरेशनला कर्जेंहि काढतां येतील. ह्या कर्जांच्या फेडीची हमी सरकार स्वतः घेईल. अन्नधान्य पिकविणाऱ्या एखाद्या शेतकऱ्यानें पांच वर्षेंपर्यंतच्या मुदतीचें कर्ज काढलें असेल तर त्याबद्दलची हमी स्वीकारण्याचा हक्क कॉर्पोरेशनला राहील.

### मच्छीमारीच्या धंद्याचें यांत्रिकीकरण

हिंदच्या दीर्घ किनाऱ्यावर मच्छीमारीचा व्यवसाय अनेक ठिकाणीं करण्यांत येतो. परंतु ह्या धंद्याचें आधुनिक तंत्र आणि तें वापरण्यासाठीं लागणारीं यांत्रिक साधनें ह्यांच्या अभावीं समुद्रापासून मिळणाऱ्या मासळीची पुरेशी निपज होत नाहीं. गेल्या कांहीं वर्षांत भारताला ह्या धंद्यांत नॉर्वेकडून चांगली मदत मिळत आहे. मच्छीमारीच्या धंद्याचीं आधुनिक अवजारें पुरवून तीं वापरण्याचें कसबहि नॉर्वे भारतामधील कोळ्यांना पुरवीत आहे. ठिकठिकाणच्या मच्छीमारीच्या केंद्रांना यंत्रचलित बोटी पुरविण्यांत येत आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस अशा प्रकारच्या १३०० नव्या बोटींचा उपयोग ह्या धंद्यांत होऊं लागेल. नव्या साधनांचा वापर करूं लागल्यावर मासळी मोठ्या प्रमाणावर पकडली जाईल. त्याच्या सांठ्याची, टिकविण्याची आणि बाजारपेठेची नीट व्यवस्था लावली तरच ह्या वाढलेल्या पैदाशीचा उपयोग होईल. ह्या बाबतींतहि नॉर्वेकडून भारताला मार्गदर्शन व मदत ह्यांचा लाभ होत आहे. भारतांत मच्छीमारीच्या व्यवसायांत सुमारें ८५ हजार देशी बोटी गुंतलेल्या आहेत. ह्या बोटींच्या साह्यानें खोल समुद्रांत जाऊन मच्छीमारी करतां येत नाहीं. किनाऱ्यापासून ३ ते ६ मैलांपर्यंतच त्या आपलें काम करूं शकतात. यंत्रचलित बोटी मात्र समुद्रांत दूरवर जाऊन खोल पाण्यांत मच्छीमारी करूं शकतात. यंत्रचलित बोटींच्या साह्यानें दर बोटीमागें दरसाल ४० हजार पौंड मासळी पकडतां येते. ह्या बोटींत आणखीहि बऱ्याच सुधारणा करतां येण्यासारख्या आहेत. भारतामधील कोळी दरसाल सरासरी ५ हजार पौंड वजनाची मासळी पकडूं शकतो. नॉर्वेमधील प्रगत कोळी दरसाल सरासरी १॥ लाख पौंड मासळी पकडतो. ह्यावरून ह्या धंद्यात अद्याप किती प्रगति करण्यासारखी आहे हें उघड आहे.

---

### गुरांची पैदास : कृत्रिम गर्भधारणा स्वस्त

महाराष्ट्र सरकारनें चांगल्या जातीच्या गुरांची पैदास करण्याचीं सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारीं केंद्रें स्थापन करण्याचें ठरविलें आहे. राज्यसरकारनें चालविलेलीं अशीं २० केंद्रें सध्यां राज्यांत आहेत. परंतु त्यांच्याकडून होणाऱ्या कामाला साहजिकच कांहीं मर्यादा पडतात. शिवाय ह्या केंद्रांच्या कामामुळें गुरांच्या दर्जांत फारसा फरक पडलेला आढळून आलेला नाहीं. पशुवैद्यकांतील तज्ज्ञांच्या मतानें केवळ गुरांची पैदास करणाऱ्या केंद्रांच्या साह्यानें त्यांचा दर्जा वाढणार नाहीं. त्यासाठीं कृत्रिम गर्भधारणेच्या तंत्राचा अवलंब केला तर तें अधिक प्रभावी ठरेल. शिवाय नैसर्गिक जननापेक्षा कृत्रिम गर्भधारणेच्या साह्यानें करण्यांत येणारें जनन अधिक परिणामकारक व स्वस्त पडतें असा अनुभव आहे. ह्या पद्धतीनें ७ कोटी गाईंसाठी फक्त १ हजार जातिवंत वळूंची गरज लागेल असा हिशेब इंडिअन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च ह्या संस्थेनें केला आहे.

### भारतामधील बेकारीची समस्या

दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत नवीन रोजगारी निर्माण करण्याचीं जीं उद्दिष्टें नमूद करण्यांत आलीं होतीं तीं गांठण्यांत यश आलेलें नाहीं. म्हणून चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची आंखणी करतांना ह्या गोष्टीची मुद्दाम दखल घेण्यांत येणार आहे. दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत वाढीचा वेग जितका असेल अशी अपेक्षा होती त्यापेक्षा तो कमी झालेला आढळून आला. त्यामुळें ठरलेलीं उद्दिष्टें गांठण्यांत अपयश आलें. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत २·१ कोटी रोजगारांच्या संधि निर्माण करण्याचे प्रयत्न करण्यांत येतील. चौथ्या योजनेच्या आरंभीं मागील सांचत आलेल्या बेकारांची संख्या सुमारें १·२ कोटी असेल असा अंदाज आहे.

उसाच्या चिपाडापासून कागद

# १२ कोटी रु.च्या सहकारी कागदकारखान्याची पूर्व तयारी

## जागतिक दौऱ्याची माहिती

### ( श्री. रत्नापा कुंभार ह्यांचें निवेदन )

कोल्हापूर, सांगली व सातारा या परिसरांतील श्री पंचगंगा, श्री वारणा, शेतकरी व श्री कृष्णा या चार सहकारी साखर कारखान्यांच्या संयुक्त प्रयत्नानें भारत सहकारी कागद कारखाना काढण्याचा विचार झाल्यानंतर त्यासंबंधीं आवश्यक असणारी मशिनरी, उसाच्या चिपाडांपासून कागद तयार करण्याच्या पद्धति आणि त्याची एकंदर आर्थिक बाजू यासंबंधीची माहिती घेण्यासाठी सदर ४ साखर कारखान्यांचे प्रतिनिधि म्हणून सर्वश्री रत्नापा कुंभार, तात्यासाहेब कोरे, वसंतरावदादा पाटील, जयवंतराव भोसले व आबासाहेब कुलकर्णी व राज्य सरकारचे व भारत सरकारचे प्रतिनिधि म्हणून अनुक्रमें श्री. माधवराव राजवाडे व डॉ. नरसिंहन अशा सात लोकांचें शिष्टमंडळ ता. २५ सप्टेंबर १९६४ पासून ता. ११ नोव्हेंबर १९६४ पर्यंत ४५ दिवसांचा जागतिक दौरा पूर्ण करून परत आलें आहे.

### ११ देशांतील ३७ शहरांना भेटी

या दौऱ्यामधील सर्व प्रवास विमानानेंच झाला असून तो एकूण ३५ हजार मैलांचा आहे. त्याशिवाय कांहीं थोडा प्रवास मोटारीनें झाला आहे. बॅगॅसपासून कागद तयार करण्याच्या पद्धति या एका देशांत, त्यासंबंधीचे कन्सल्टिंग व प्रोसेसिंग एंजिनिअर्सच्या संस्था दुसऱ्या देशांत आणि कागद कारखान्याची मशिनरी तयार करणारे कारखाने हे इतर कांहीं देशांत असल्यामुळें यासंबंधीची आवश्यक असणारी संपूर्ण माहिती मिळवण्यासाठी आम्हांला बऱ्याच निरनिराळ्या देशांना भेटी द्याव्या लागल्या. त्यामुळेंच आमच्या या शिष्टमंडळाच्या दौऱ्याला जागतिक दौऱ्याचें स्वरूप आलें. या दौऱ्यामध्यें पश्चिम जर्मनी, इंग्लंड, कॅनडा, युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका, पुर्टो रिको, व्हेनेझुला, कोलंबिया, मेक्सिको, पनामा, जपान व हाँगकाँग या एकूण ११ देशांमधील फ्रॅंकफर्ट, आशानबर्ग, ड्युसेलडॉर्फ, ईशेन, ग्रीव्हेन ब्रॉईश, ब्रॉन्सव्हाइग, हॅंबुर्ग, लंडन, मॅंचेस्टर, बेरी, आईसफोर्ड, बोस्टन, मॉंट्रिअल, कॉर्नवॉल, ओटावा, व्हॅंकुव्हर, न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, शिकागो, बेलाईट, वासू, पोर्ट एडवर्ड, सॅन्‌फ्रॅन्सिस्को, होनोलुलू, शान व्हान, आरिसिबो, लॉस कॅनॉस, कॅरॅक्स, वेनेपाल, मंपा, कॅली, व्हॅले, मेक्सिको, आयोटला, पिसो, टोकिओ व हाँगकाँग अशा एकूण ३७ शहरांना भेटी दिल्या.

### संबंधित मंडळींबरोबर चर्चा

या दौऱ्यामध्यें बॅगॅसपासून कागद तयार करण्याच्या एकूण पांच पद्धति ( प्रोसेस ) संबंधी सदर पद्धतींच्या संबंधित मंडळींच्या बरोबर सर्वांगपूर्ण चर्चा करून माहिती घेतलेली आहे. त्या पांच पद्धति पुढीलप्रमाणें आहेत—

( १ ) ए. झेड. प्रोसेस (रिटर्स प्रोसेस बरोबर ), ( २ ) पीडको प्रोसेस, ( ३ ) आयोटला प्रोसेस, ( ४ ) सायमन हॅंडलिंग–क्रुसी प्रोसेस, ( ५ ) पार्सन व्हिटमोर प्रोसेस.

या पांच पद्धतीचे गुणधर्म ज्या त्या मंडळींनीं आम्हांला समजावून सांगितले आहेत. या पांचहि पद्धतींवर चालू असलेले उसाच्या चिपाडांवरील कागद कारखाने जगामध्यें निरनिराळ्या देशांमध्यें आहेत त्यांपैकी ए. झेड. प्रोसेसवर चालू असलेले कारखाने हे आफ्रिकेमध्यें असल्यानें ते आम्हांला पाहतां आले नाहींत. पार्सन व्हिटमोर प्रोसेसवर चालू असलेला हिंदुस्थानांतील मंड्या येथील कागद कारखाना आम्हीं पूर्वींच पाहिलेला आहे. बाकीच्या तीन पद्धतींवर चालू असलेले कागद कारखाने आम्ही या दौऱ्यामध्यें प्रत्यक्ष पाहून त्यासंबंधीं सविस्तर माहिती घेतली आहे. पीडको प्रोसेसवर चालू असलेले दोन कारखाने, आयोटला प्रोसेसवरील एक कारखाना व सायमन हॅंडलिंग क्रुसी प्रोसेसवरील एक असे चार कारखाने आम्ही पाहून घेतले आहेत. या कारखान्यांची कपॅसिटी ५० पासून २०० टनांपर्यंत आहे.

कागद कारखान्याची मशिनरी तयार करणाऱ्या एकूण पांच महत्त्वाच्या व प्रख्यात कारखानदारांशीं आमची चर्चा झाली आहे. ते कारखानदार पुढीलप्रमाणे—

( १ ) मेसर्स क्रप्स ईशेन, प. जर्मनी, ( २ ) मेसर्स वॉम्स्ले ग्रुप ऑफ कं. लि., बेरी, इंग्लंड, ( ३ ) मेसर्स डोमिनिअन इंजिनिअरिंग वर्क्स लि., मॉंट्रिअल, कॅनडा, ( ४ ) मेसर्स बेलॉइट कार्पोरेशन लि., बेलॉइट, यू. एस्. ए., ( ५ ) मेसर्स पार्सन व्हिटमोर व त्यांचे जपानी कोलॅबोरेटर्स, टोकिओ, जपान.

या कारखानदारांची मशिनरी प्रत्यक्ष ज्या कागद कारखान्यामध्यें चालू आहे असे लांकडावर चालणारे एकूण सहा मोठे कागदाचे कारखाने आम्हीं या दौऱ्यामध्यें पाहिले आहेत. मेसर्स क्रप्स, वॉम्स्ले, डोमिनिअन, बेलाइट हीं नावें कागद कारखान्याच्या मशिनरीशीं अतिशय निगडित झालेलीं आम्हांला आढळून आले. पार्सन व्हिटमोर व त्यांचे जपानी कोलॅबोरेटर्स यांची मशिनरी मात्र पाहावयास मिळाली नाहीं. त्यांचा बगॅसवरचा कारखाना हा फोर्मोसामध्यें चालू आहे. तेथें आम्ही जाऊं शकलों नाहीं. आम्हीं पाहिलेल्या बगॅसवरील व लांकडावरील कागद कारखान्यांतील मशिनरी चांगली वाटली.

कागद कारखान्यासंबंधीं आर्थिक, तांत्रिक वगैरे सर्व बाजूंचा विचार करून प्रोजेक्ट तयार करणाऱ्या आणि सल्ला देणाऱ्या एकूण दहा महत्त्वाच्या एंजिनिअरिंग फर्म्सबरोबर आमच्या प्रदीर्घ चर्चा झाल्या आहेत.

लांकूड पल्पवरील सहा कागद कारखाने व बॅगॅसवरील चार कागद कारखाने असे एकूण दहा कागद कारखान्यांचें काम प्रत्यक्ष पाहिलें, पांच महत्त्वाच्या पद्धतींसंबंधीं माहिती घेतली, पांच जगप्रसिद्ध कागद कारखान्यांची मशिनरी तयार करणाऱ्या कंपन्यांबरोबर बोलणें केलें आणि दहा कन्सल्टिंग व प्रोजेक्टिंग एंजिनिअरिंग फर्म्सबरोबर चर्चा केली, हें दिसून येईल. वरील पद्धती, प्रोजेक्टिंग एंजिनिअर्स आणि कारखानदार यांची नामावली निरनिराळी दिसत असली तरी त्यांचा एकमेकांचा व्यावसायिक संबंध निगडीत झालेला आहे.

### " उसाच्या चिपाडांपासून चांगला कागद होतो " आमची खात्री

वरील सर्व माहिती घेतल्यानंतर उसाच्या चिपाडापासून चांगल्या तऱ्हेचा कागद होतो याची आम्हांला खात्री झालेली आहे. पन्नास टक्क्यांपासून १०० टक्केपर्यंत बगॅस वापरून निरनिराळ्या प्रकारचा किफायतशीर कागद होऊं शकतो याची प्रत्यक्ष प्रचीती आलेली आहे. रायटिंग व प्रिंटिंग कागद तयार करावयाचा झाल्यास कमींत कमी १०० टनांचा कागदाचा कारखाना काढण्याची आवश्यकता दिसून आली. तो २०० टनी असल्यास अधिक भक्कम आणि चांगलें होणार आहे. कॉरुगेटेड ब्राऊन पेपर काढावयाचा झाल्यास १०० टनी कागद कारखाना चांगला किफायतशीर हातो. न्यूजप्रिंट काढावयाचा असल्यास

२०० टनांपासून ३०० टनांपर्यंत कपॅसिटी असणें आवश्यक आहे. १०० टनी कागद् कारखाना काढण्यासाठी सर्वसाधारण कमींत कमी १० कोटी ते १२ कोटी रुपये भांडवली खर्च लागणार आहे. या सर्व कारखानदारांबरोबर चर्चेतून हें स्पष्टपणें दिसून आलें आहे कीं, कागद् कारखान्याच्या मशिनरीला ऑर्डर दिल्यापासून २½ ते ३ वर्षांच्या आंत कागद् कारखान्याची उभारणी पूर्ण होऊन प्रत्यक्ष कागद् काढण्याला सुरुवात करतां येते. अमेरिकेच्या मशिनरीपेक्षा इंग्लंडची मशिनरी ५/१० टक्क्यांनीं कमी किंमतीला मिळूं शकेल. कॅनडाच्या मशिनरीला ५/१० टक्के अधिक किंमत पडण्याची शक्यता आहे. जपानची मशिनरी या सर्व देशांतील मशिनरींपेक्षा २० ते २५ टक्के कमी किंमतीला मिळण्याची शक्यता आहे. जर्मनीची मशिनरी इंग्लंडच्या मशिनरीच्या किंमतीच्या आसपास मिळूं शकणारं आहे. निरनिराळ्या देशांतील ही मशिनरी वर्कमनशिपच्या दृष्टीनें डावी उजवी असण्याचें कारण नाहीं असें दिसून आलें. त्याचप्रमाणें ही मशिनरी पुरवठा करीत असतांना त्यामध्यें कमींत कमी २५ ते ३० टक्के मशिनरी हिंदुस्थानांतून उपलब्ध करून देण्याची तयारी सर्वांनीं दाखवलेली आहे.

### महत्त्वाच्या निर्णयापूर्वी विचारविनिमय

वरील सर्व गोष्टींचा विचार करून पद्धति कोणती वापरावी, प्रोजेक्टिंग इंजिनिअर्स कोणते निवडावे, मशिनरी कोणत्या कंपनीची व कोणत्या देशाची घ्यावी, वगैरे सर्व प्रश्नांचा विचार करून आम्हांला निर्णय घ्यावयाचा आहे. हा निर्णय घेत असतांना भांडवली खर्च कमी येईल, मशिनरी चांगली असेल आणि व्यवहारांतील फायदा अधिक होईल ही दृष्टि ठेवूनच आमचा निर्णय होईल.

वरील सर्व गोष्टी आम्ही पाहून आल्यानंतर निरनिराळ्या मंडळांशीं झालेल्या चर्चेस अनुसरून त्यांच्याकडून प्राथमिक प्रोजेक्ट रिपोर्ट्स आमच्याकडे येणार आहेत. त्या रिपोर्टांचा विचार करून पद्धति कोणती चांगली याची आम्ही निवड करावयाची आहे. त्या पद्धतीवर अवलंबून फायनल प्रोजेक्ट रिपोर्ट करण्याची जबाबदारी कोणत्या मंडळीकडे सोंपवावी हें ठरवावयाचें असून त्यानंतर माशनरी पुरवठा करणाऱ्या कारखान्याची कन्सल्टिंग एंजिनिअर्सच्या सल्ल्यानें आम्हांला निवड करावयाची आहे. या सर्व बाबींचा निर्णय अर्थात् राज्य सरकार आणि मध्यवर्ती सरकार यांच्या सल्ल्यानें आणि विचारविनिमयानेंच होणार आहे.

वरील सर्व गोष्टींची पूर्तता लवकरांत लवकर व्हावी असाच आमचा प्रयत्न राहील. मला स्वतःला असा विश्वास वाटतो कीं, या कामाची पूर्तता लवकरांत लवकर होईल. आणि सहकारी क्षेत्रांतील १२ कोटी रुपये भांडवलाचा मोठा व पहिला कागद् कारखाना अस्तित्वांत आणण्याचें आमचें मनोरथ पूर्ण होतील. अर्थात या कामीं राज्य सरकार आणि मध्यवर्ती सरकार यांचें साहाय्य व प्रोत्साहन निश्चितपणें मिळेल यासंबंधीं मला शंका वाटत नाहीं.

**वाफेच्या एंजिनांची निर्मिति बंद**—भारतामधील रेल्वेमार्गावर धावणारी वाफेचीं एंजिनें रद्द करण्याच्या कार्यक्रमाचा विचार रेल्वेखाते करीत आहे. संकल्पित कार्यक्रम टप्प्यानें अंमलांत येणार असून तो पूर्ण होण्यास ३० ते ४० वर्षांचा अवधी लागेल. तथापि, १९७०–७१ पासून देशांत तयार होणाऱ्या वाफेच्या रेल्वे एंजिनांचें उत्पादन कमी कमी करण्यास मात्र प्रारंभ होणार आहे. ह्या एंजिनाऐवजीं विजेवर व तेलावर चालणारीं एंजिनें अधिक कार्यक्षम असतात.


# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी :
१, बेंक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई–१
टेलिफोन नं. २५५४७४–७५,
२५६२१४ २५४७८१

: विभागीय कचेरी :
महाल : नागपूर.
तारेचा पत्ता :
फार्मर बँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ४ कोटी ८४ लाख |
| गंगाजळी व फंड | ... | १ कोटी ४३ लाख |
| ठेवी | ... | ३५ कोटी १४ लाख |
| खेळतें भांडवल | ... | ७५ कोटी १५ लाख |

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

: बृहन्मुंबईतील शाखा :
(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी.

वि. म. जोगळेकर,
जनरल मॅनेजर.



# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ता:–युवर बँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

सेव्हिंग्ज बँक:–३ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष–४¼ टक्के, २ वर्षें–४½ टक्के, ३ वर्षें–४¾ टक्के, ४ वर्षें–५ टक्के, ५ वर्षें–५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा–विस्तार

शाखा–१. मुंबई–फोर्ट, २. मुंबई–गिरगांव, ३ मुंबई–दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केटयार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड. दि. ३१ १२–१९६३

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ११,९३,२५० |
| गंगाजळी | रु. | ६,५०,००० |
| ठेवी | रु | ४,००,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,५०,००,०००हून अधिक |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी,
बी. ए., बी. कॉम्.,
जनरल मॅनेजर.

रा. ना. गोडबोले,
बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी
चेअरमन.

**रशिआला निर्यात होणारा माल**—भारतापासून रशिआला काय माल घेतां येईल ह्याचा अदमास घेण्यासाठी रशिअन व्यापारी-प्रतिनिधींचें मंडळ भारतात आलें होतें. भारतामधील व्यापारी व उद्योगपतींशीं वाटाघाटी करून तें परत गेलें. भारताकडून १९६५ सालीं तंबाखू, कच्ची व कमावलेलीं कातडीं आणि कांहीं यंत्र-सामग्री घेण्याचें रशिआनें ठरविलें आहे.

**पूर्व युरोपांतील देशांशीं वाढता व्यापार**—झेकोस्लोव्हेकिया, रुमेनिआ, बल्गेरिआ आणि हंगेरी ह्या पूर्व युरोपांतील देशाचा दौरा करण्यासाठीं गेलेलें भारताचें व्यापारी मंडळ परत आलें आहे. १९६५ सालीं ह्या देशांशीं होणारा भारताचा व्यापार सध्यांपेक्षा २५ टक्क्यांनें किंवा त्याहीपेक्षा अधिक वाढेल असा विश्वास मंडळानें व्यक्त केला आहे. गेल्या वर्षी भारताची परदेशीय निर्यात सुमारें ८०० कोटी रुपयांची झाली, त्यांपैकी २०० कोटी रुपये किमतीची निर्यात पूर्व युरोपांतील देश व रशिआ ह्या देशांना करण्यांत आली.

**मॉस्कोंत ' भारत ' त्रैमासिक**—पं. जवाहरलाल नेहरू ह्यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्तानें मॉस्को येथें ' भारत ' ह्या नांवाचें एक त्रैमासिक सुरू करण्यांत येत आहे. ह्या त्रैमासिकांत भारत व रशिआ ह्यांच्यांतील आर्थिक, व्यापारी आणि सांस्कृतिक संबंधांविषयीं लिखाण येणार आहे. त्रैमासिक रशिअन भाषेंत प्रसिद्ध करण्यांत येणार असून त्याची सजावट व आकर्षकता ह्यांच्याकडे विशेष लक्ष देण्यांत येईल.

**ब्रिटनच्या बोटीला दंड**—ब्रिटन व अमेरिका ह्या दोन देशांच्या दरम्यान विलासी प्रवासी वाहतूक करणाऱ्या ' क्वीन मेरी ' ह्या ब्रिटिश बोटीला न्यूयॉर्क शहराच्या स्थानिक अधिकाऱ्यांनीं १०० डॉलर्स दंड केला आहे. बंदरांत नांगरून पडणाऱ्या बोटींनीं धूर सोडण्याबाबत कांहीं नियमांचें पालन करावयाचें असतें. ' क्वीन मेरी'नें त्यांचा भंग करून दाट धूर सोडल्याबद्दल ही शिक्षा करण्यांत आली.


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२६००

बचतीच्या आकर्षक योजना

(१) स्पेशल सेव्हिंग — व्याजाचा दर ३॥ टक्के
(२) त्रैवार्षिक मासिक बचत — " ३॥ "
(३) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें — " ५ "

मुदतीच्या आकर्षक दरासंबंधी चौकशी करा.

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल ... | रु. | १० लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् ... | रु. | १५ ,, |
| ठेवी ... | रु. | ४१४ ,, |
| खेळतें भांडवल ... | रु. | ४५० ,, |


शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.



स्थापना १९१८

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

महाराष्ट्र सरकारनें तगाईवर मंजूर केलेले "विजय" नांगर वापरा. ४, ६ व ८ बैली फाळ व सुटे भाग



तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्



विजय पंपींग सेट १" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

### भाताच्या नव्या जातीची चाचणी

गेल्या सप्टेंबर महिन्यांत फिलिपाइन्स बेटांत मॅनिला येथें आंतरराष्ट्रीय तांदूळ संशोधन परिषद् भरविण्यांत आली होती. ह्या परिषदेला उत्तर प्रदेशांतील एक शेतीशास्त्रज्ञ गेले होते. त्यांनीं अशी सूचना केली आहे कीं, फिलिपाइन्स बेटांत लावण्यांत येणाऱ्या कांहीं जातींच्या भाताची लावणी भारतांत करण्यांत यावी आणि भाताच्या पैदाशींत वाढ होते किंवा काय ह्याची चांचणी करण्यांत यावी. फिलिपाइन्स बेटांत भाताच्या कांहीं नव्या जातींचा शोध लावण्यांत आला असून त्यामुळें भाताच्या दर एकरीं पिकांत चांगली वाढ होते असें त्यांचें म्हणणें आहे. ह्या जातीच्या भाताचें फिलिपाइन्स मधील पीक दर एकरीं ३,५०० पौंडांपासून ८,००० पौंडांपर्यंत येतें. भारता-मधील भाताचें दर एकरीं पीक १,५०० तें ३,००० पौंडांपेक्षा अधिक नाहीं. दोन्हीं देशांतील भाताच्या जमिनींचा कस जवळ जवळ सारखाच आहे.

### भ्रूणहत्यांचें भारतामधील प्रमाण

पुणें येथील गोखले राजकारण व अर्थकारण संस्थेनें भ्रूणहत्या कायदेशीर करावी किंवा काय, ह्या विषयावर परिसंवाद भरविला होता. ह्या परिषदेंत बोलतांना संस्थेच्या डॉ. कुमुदिनी दांडेकर म्हणाल्या कीं, भारतामधील गर्भधारणांपैकी ५ टक्के गर्भ नष्ट करण्यांत येतात. अर्थात् हा अंदाज आहे. कारण, बहुतेक भ्रूणहत्येचे प्रकार मुद्दाम केलेले आणि बेकायदेशीर असतात. प्रगत देशांत भ्रूणहत्या अधिक प्रमाणांत करण्यांत येतात. न्यूयॉर्कमध्यें गर्भधारणांपैकी १७ टक्के गर्भधारणांचीं परिणति भ्रूणहत्येंत होते. ब्रिटनमधील हें प्रमाण ८ टक्के आहे. जपान व पूर्व युरोपांतील देशांचा अनुभव लक्षांत घेता भ्रूणहत्या कायदेशीर केल्यास त्यांची भारतामधील संख्या खूपच वाढेल. ती सुमारें ७० लाख ते ९० लाख होईल. पण एवढी जबाबदारी वैद्यकीय व्यवसायाला झेपेल किंवा नाहीं हाच प्रश्न आहे.

### भ्रूणहत्या आणि दयाबुद्धीनें केलेली हत्या कायदेशीर करण्याची सूचना

पुणें येथील रोटरी क्लबांत डॉ. एच. व्ही. सरदेसाई ह्यांनीं ‘वैद्यक शास्त्रांतील कांहीं चालू प्रश्न’ ह्या विषयावर व्याख्यान दिलें. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं देशांत भ्रूणहत्या आणि जे रोगी जगणें अशक्य आहे अशा रोग्यांना दयाबुद्धीनें मृत्यु-मुखीं लोटण्याचे प्रकार चालू आहेत. हे दोन्हीं प्रकार अर्थातच बेकायदा आहेत. त्यामुळें असल्या प्रकारांत काळ्या पैशाची मोठ्या प्रमाणावर देवघेव होत असते. अशा परिस्थितींत ज्या रोग्यांना असाध्य रोग झाल्यामुळें अतिशय यातना सोसाव्या लागतात, त्यांना शांतपणें मृत्यूच्या स्वाधीन करण्यासाठी समाजांतील सुबुद्ध लोकांनीं अनुकूल वातावरण निर्माण केलें पाहिजे. भ्रूण-हत्येच्या बाबतींतहि लोकांच्या मनांत बदल घडवून आणला पाहिजे. भ्रूणहत्या आणि दयाबुद्धीनें केलेली हत्या ह्यांना कायद्याची मान्यता मिळाली पाहिजे.

### पोलंडकडून ट्रॅक्टर्सची आयात

पोलंड भारताला ३,४०० ट्रॅक्टर्स पुरविण्यास तयार आहे. हे ट्रॅक्टर्स भारतामधील हवामानाला व परिस्थितीला तोंड देऊं शकतील किंवा नाहीं, ह्याविषयीं त्यांची चांचणी घेण्यांत आलेली आहे. ह्या ट्रॅक्टर्सची भारतांत जुळवा जुळव करण्याचा परवाना एका कंपनीला देण्यांत आला आहे. ट्रॅक्टर्सचे भाग आयात करण्यांत येणार आहेत.


**सरदारगृह**

**मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**
**मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.**

— आमचीं वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दी दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.


फोन नं. :–३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




**बेडेकर**
**मसाले, लोणचीं व पापड**
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
मुगभाट, मुंबई ४.
शाखा: ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

श्री. वा. काळे ह्यांचीं
**कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें**
**१ कण आणि क्षण, २ पुढें पाऊल,**
**३ तुमचें स्थान कोणतें ?**

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES



*Make doubly sure by fitting*

**GADRE BANDHU**
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

## चार्टर्ड अकौंटंटनें किती [illegible]डिट्स करावीं ?

### नियंत्रणाची आ[illegible]वश्यकता

कांहीं थोड्या लोकांच्याच हातांत आर्थिक सत्ता एकवटूं नये, ह्यांसाठी कंपनी कायद्यानें व्यक्तींच्या कमाल संचालकपदांवर नियंत्रण आणलें आहे. कांहीं मोठ्या फर्म्सकडे ऑडिट्स्चें काम केंद्रित झालें आहे, आणि इतर फर्म्सना योग्य तेवढें काम मिळत नाहीं; तेव्हां एका फर्मचें जास्तींत जास्त किती कंपन्यांचीं ऑडिट्स करावें, हें ठरवून टाकायला काय हरकत आहे ? असा प्रश्न चर्चिला जात आहे. कंपनी कायद्याप्रमाणें कोणालाहि २० पेक्षा अधिक कंपन्यांचे डायरेक्टर राहतां येत नाहीं. डायरेक्टर हा बोर्डाचा एक सदस्य असतो; एखादी गोष्ट झाली किंवा झाली नाहीं तर त्याला जबाबदार असणारावर जोखीम टाकून तो कायद्यांतून निसटूं शकतो. ऑडिटर हा व्यक्तिशः जबाबदार असतो; आपल्या हाताखालच्या चार्टर्ड अकौंटंटवरहि तो कायदेशीर रीत्या विसंबू शकत नाहीं. फर्ममधील कुणाचीहि चूक झाली, तरी तोच त्याला जबाबदार धरला जातो. डायरेक्टरप्रमाणें तो इतरांवर जबाबदारी लोटूं शकत नाहीं. तो व्यक्तिशः काम करीत असतो. अशा परिस्थितींत, ऑडिटरच्या कमाल ऑडिट्सवर मर्यादा घालण्यास हरकत दिसत नाहीं; कारण एक मनुष्य किती ठिकाणीं लक्ष पुरवूं शकेल, ह्याला मर्यादा आहे. कांहीं फर्म्समध्यें ऑडिटचें काम केंद्रित झालें असेल, तर आपोआपच त्याचा बोजा त्यामुळें कमी होऊन इतर फर्म्सना काम मिळूं शकेल. ऑडिट्चा दर्जाहि त्यामुळें सुधारून नवे लोक ह्या व्यवसायांत येण्यास प्रोत्साहन मिळेल.

---

### मध्यप्रदेशांतील अल्युमिनमचा कारखाना

मध्यप्रदेशांत कोरबा ह्या ठिकाणी हंगेरीच्या मदतीनें अल्युमिनमचा कारखाना काढण्यांत यावयाचा आहे. संकल्पित कारखान्यासंबंधीचा अहवाल हंगेरिअन तंत्रज्ञ तयार करणार आहेत. हा अहवाल दोन भागांत तयार करण्यांत येईल. तो सुमारें १० महिन्यांनी भारत सरकारच्या हातीं येईल. ह्या भागांत कारखान्यासाठीं लागणाऱ्या साधनसामग्रीची तपशीलवार चिकित्सा करण्यांत येणार आहे. अहवाल हातीं आल्यानंतर कारखान्याचा आकार व त्याची उत्पादनक्षमता ह्याबद्दल भारत सरकार अखेरचा निर्णय घेईल. कारखान्यांसाठीं लागणाऱ्या परदेशीय चलनाची सोय हंगेरीचें सरकार कर्ज देऊन करणार आहे. येत्या जानेवारींत हंगेरिअन तंत्रज्ञांचें एक मंडळ अहवालाच्या कामासाठी भारतांत येणार आहे. कारखान्यांत दरसाल १ लाख, २० हजार टन अल्युमिनम तयार करण्याचा मानस आहे.

---

**कापसाच्या पिकाची जबर नुकसानी**—नगर जिल्ह्यांत देवराज कापसाचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर करण्यांत येतें. हा कापूस लांब धागा देणारा असतो. परंतु ह्या हंगामांत पिकावर रोग पडल्यानें त्याचे उत्पादन ७५ टक्के कमी होईल. सामान्यपणें देवराज जातीच्या कापसाचीं बोंडें ५ वेळां निघतात. परंतु चालू वर्षीं एकदा तोडणी झाल्यावर पिकाला रोगाची बाधा झाल्यानें शेतकरी शेतें पुन्हा नांगरू लागले आहेत. गेल्या वर्षी नगर जिल्ह्यांतील ह्या जातीच्या कापसाचें उत्पादन दर एकरांत सरासरी ७ क्विंटल आलें होतें. चालू हंगामांत मात्र उत्पादन सुमारें २ क्विंटलच्या आसपासच झाले असावें. कापसाच्या पिकावर रोग पडल्यामुळें शेतकऱ्यांचें ५ कोटी रुपयांचें नुकसान होईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

### ग्रेट ब्रिटन अडचणींत

ब्रिटिश बँक रेट गेल्या आठवड्यांत २% नें वाढवून तो ७% करण्यांत आला. ब्रिटिश पौंडाची किंमत एकदम घसरूं लागली, ती घसरगुंडी सावरण्यासाठी ही योजना आहे. बँक ऑफ इंग्लंडला एका दिवसांत २ कोटी पौंडांचा चलनाचें अवमूल्यन थांबविण्यासाठी वापर करावा लागला. आयात-निर्यातींमधील तफावतीची प्रतिकूलता वाढतच आहे आणि पौंड ग्रेट ब्रिटनच्या बाहेर पलायन करीत आहे. आयातीवर जकाती लादण्यांत आल्या आहेत, त्याबद्दल युरोपियन फ्री ट्रेड एरियाच्या देशांनीं आणि राष्ट्रकुलाच्या सभासद देशांनीं नापसंती व्यक्त केली आहे. जकातीचे सरचार्ज लवकरच दूर करण्याचें आश्वासन सरकारनें दिलें आहे. निर्गत होणाऱ्या मालाच्या उत्पादकावर बँकरेटच्या वाढीचा परिणाम प्रतिकूल होणार आहे.

---

### एअर होस्टेसेसचा नवा युनिफॉर्म

इंडियन एअरलाइन्स कॉर्पोरेशनच्या एअर होस्टेसचा सध्याचा युनिफॉर्म निळ्या रंगाचा आहे, तो ह्यापुढें तांबूस रंगाचा राहील. मदुरा जिल्ह्यांतील हातमागाच्या २,००० रेशमी नव्या रंगाच्या साड्या खरेदी करण्यांत आल्या आहेत. नव्या युनिफॉर्मचे दोन सेट्स तूर्त देण्यांत येणार आहेत. पुढें त्यांना दरसाल तीन सेट्स मिळतील. सध्याचा निळ्या रंगाचा युनिफॉर्म खराब होईपर्यंत वापरण्यांत यावयाचा आहे.

---

**टेलिव्हिजनचे सेट्स**—टेलिव्हिजनचे सेट्स भारतांत तयार करणें कितपत शक्य आहे ह्यासंबंधीं भारतसरकार चौकशी करीत आहे. ग्रामीण विभागांत कुटुंबनियोजनाचा प्रचार करण्यासाठी ह्या माध्यमाचा उपयोग करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. शिक्षणासाठीहि दूरदर्शनाच्या पद्धयांचा अधिक व्यापक प्रमाणावर उपयोग करण्याचा सरकारचा विचार आहे.

**वृद्धवेतनाची योजना बारगळली**—काम करण्यास असमर्थ अशा वृद्धांना निवृत्ति वेतन देण्याच्या एका योजनेचा मध्यवर्ती सरकारनें विचार केला व तिची तपासणी करण्यासाठी ती नियोजन समितीकडे पाठविली. चौथ्या योजनेंतील ह्या उपक्रमासाठी सरकारला सुमारें १६० कोटी रुपयांचा बोजा स्वीकारावा लागेल. त्यामुळें योजना दप्तरींच पडून राहण्याचा संभव अधिक आहे.

**सीलोनमधील औद्योगिक प्रदर्शन**—कोलंबो येथें भरविण्यांत आलेल्या औद्योगिक प्रदर्शनांत भारतानें मोठ्या प्रमाणावर भाग घेतला आहे. सीलोनला रोजखपाच्या वस्तू आणि एंजिनिअरिंगचा माल पुरविणाऱ्या देशांत भारताचा क्रम बराच वरचा लागतो. कापड गिरण्यांची यंत्रसामग्री, धातुकामाची यंत्रसामग्री, रबराचा माल तयार करण्याची यंत्रसामग्री, इत्यादि माल प्रदर्शनांत ठेवण्यांत आला आहे.

**मच्छीमारीचीं नवीं केंद्रें**—नॉर्वेच्या साह्यानें मद्रास राज्यांत मच्छीमारीच्या व्यवसायाचें एक केंद्र स्थापन करण्यांत आलेलें आहे. आतां आणखी दोन केंद्रें स्थापन करण्यांत येणार आहेत. त्यापैकीं एक म्हैसूर राज्यांत आणि दुसरें केरळ राज्यांत असेल. भारतांत मच्छीमारीच्या व्यवसायाचा विकास करण्यासाठी नॉर्वेकडून १२ वर्षांपूर्वी मदत मिळण्यास प्रारंभ झाला. तेव्हांपासून ह्या कामीं ४ कोटी रुपयांचीं रक्कम भारताला मदत म्हणून मिळाली आहे. मच्छीमारीच्या व्यवसायांत नॉर्वे अग्रेसर मानला जातो.



शीतल, झुळझुळीत,
आणि वापरायला
अत्यंत मनोरम व सुखद
ठाकरसी
फॅशनसाठी सर्वोत्तम पसंती फॅब्रिक्स
या कापडावर असें लेबल असतें
·SANFORIZED·

THACKERSEY FABRICS
ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स
- धी हिंदुस्तान स्पिनिंग अॅण्ड वीव्हिंग मिल्स कंपनी लिमिटेड
- धी क्राऊन स्पिनिंग अॅण्ड मॅन्यु. कंपनी लिमिटेड
- धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड



# May We Mind Your Own Business?

We have made it our business to help you in any kind of banking or financial transactions. Because of our long and thorough knowledge of the agricultural and industrial economy of India, we are in a position to give you the best possible assistance in the finance of her internal and external trade.

## *In business since 1806*

The State Bank of India was constituted in 1955 for the purpose of taking over the undertaking of the Imperial Bank of India (established in 1921). The Imperial Bank had been formed by the amalgamation of three Banks; The Bank of Bengal (estd. : 1806); The Bank of Bombay (estd. : 1840); and The Bank of Madras (estd. : 1843). Thus the origin of the State Bank dates back to 1806.

The State Bank has seven Subsidiaries : The State Bank of Bikaner and Jaipur; State Bank of Hyderabad; State Bank of Indore; State Bank of Mysore; State Bank of Patiala; State Bank of Saurashtra; State Bank of Travancore.

With Over 1700 Offices and Branch
Including those of its
SUBSIDIARIES
**THE STATE BANK OF INDIA**
is at the nation's service.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.